**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**बुधवार दिनांक १७ जून २०२६**

**ठळक बातम्या....**

1. **पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेला माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते हिरवी झेंडी.**

2. **महाराष्ट्र विधान परिषद निवडणूक २०२६ अंतर्गत नागपूर, भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची पोटनिवडणूक उद्या.**

3. **सामाजिक - राजकीय आंदोलनातील 44 खटले मागे घेण्याचा मंत्रिमंडळ उपसमितीचा निर्णय.**

4. **बुलढाणा जिल्ह्यात संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी सुरु असलेल्या आंदोलनाला हिंसक वळण.**

---------------------------------------------------

**अश्विनी वैष्णव**

पुणे रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून विद्यमान सहा फलाटांबरोबर आणखी सहा नवीन फलाट उभारले जातील. त्यामुळे स्थानकावरील एकूण फलाटांची संख्या १२ होईल. तसेच जुन्या आरआरआय प्रणालीऐवजी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय रेल्वे तसेच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुणे इथं दिली. वैष्णव यांच्या हस्ते आज पुणे रेल्वे स्थानकावर पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून सेवेला प्रारंभ करण्यात आला तसेच विविध विकासकामांचा शुभारंभ आणि पायाभरणी करण्यात आली. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस डिजिटल माध्यमातून सहभागी झाले तर केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार मंत्री मुरलीधर मोहळ आणि शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी बोलताना वैष्णव यांनी पुणे रेल्वे विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प हाती घेण्यात आल्याची माहिती दिली. हडपसर स्थानकावरील विद्यमान तीन फलाटांचे आधुनिकीकरण करून चौथा फलाट उभारण्यात आला असून त्यामुळे दररोज अतिरिक्त

पाच रेल्वेगाड्या चालवणे शक्य होणार असही वैष्णव यांनी सांगितले.दरम्यान पुण्यातील हडपसर रेल्वे स्थानकावरुन पुणे-हडपसर पाटना-दाणापूर या नव्या अमृत भारत एक्सप्रेसला वैष्णव यांनी हिरवी झेंडी दाखवली.

---------------------------------------------------

**पोटनिवडणूक तयारी**

महाराष्ट्र विधान परिषद निवडणूक २०२६ अंतर्गत नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची पोटनिवडणूक उद्या १८ जून रोजी होणार असून त्यासाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. या निवडणुकीसाठी एकूण ८३६ मतदार असून १४ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक शांततापूर्ण आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी देखील उद्या सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चार मतदान केंद्रांवर ४५७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीत मतपत्रिकेद्वारे मतदान होणार असून तीन उमेदवार रिंगणात आहेत. मतमोजणी २२ जून रोजी भंडारा इथं होणार आहे.वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर मतदारसंघ इथून भाजपचे अरुण लखाणी बिनविरोध निवडून आले आहेत तर यवतमाळ मतदारसंघ इथून शिवसेनेचे (शिंदे गट) दुष्यंत चतुर्वेदी बिनविरोध निवडून आले

---------------------------------------------------

**अरविंद सावंत**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचं प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणाऱ्या कुठल्याही बंडखोर गटाला मान्यता देऊ नये, अशी विनंती करणारं पत्र खासदार अरविंद सावंत यांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना लिहिलं आहे. प्रसार माध्यमांमधल्या वृत्तानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या निवडणूक चिन्हावर निवडून आलेले काही खासदार स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळवण्यासाठी किंवा दुसऱ्या पक्षात विलीन होण्यासाठी लोकसभा कार्यालयाशी संपर्क साधत आहेत, असं अरविंद सावंत आपल्या पत्रात म्हणाले आहेत. राजकीय पक्षापासून स्वतंत्र असा कोणताही अधिकार विधिमंडळ पक्षाकडे नसतो. नेतृत्व ठरवणं, व्हीप जारी करणं आणि सभागृहातल्या कामकाजाबाबत निर्देश जारी करणं हे अधिकार फक्त मूळ पक्षाकडेच असतात

---------------------------------------------------

**मंत्री बावनकुळे**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातल्या नेत्यांना फोडण्याच्या तथाकथित प्रयत्नांशी भाजपचा काहीही संबंध नसल्याचं भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. आपल्या पक्षातल्या काही खासदारांना विकत घेण्यासाठी भाजपाकडून १५ कोटी रुपयांची आगाऊ रक्कम दिली जात असल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला होता. त्या दाव्यावर बावनकुळे यांनी हे स्पष्टीकरण दिलं आहे. भाजप आणि त्यांच्या नेत्यांना या वादात ओढण्याचे प्रयत्न अयोग्य आहेत. उद्धव ठाकरे आपल्या आमदारांना आणि खासदारांना पक्ष सोडून जाण्यापासून रोखण्यात अपयशी ठरले आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

---------------------------------------------------

**नशामुक्त भारत अभियान**

सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत आजपासून नशामुक्त भारत सप्ताहाला सुरूवात होत आहे. या उपक्रमाद्वारे युवक, महिला, शैक्षणिक संस्था आणि समाजातील सर्व घटकांच्या सहभागातून व्यसनमुक्त भारताचा संकल्प अधिक बळकट केला जाईल. हा सप्ताह २६ जूनपर्यंत चालणार आहे.

---------------------------------------------------

**मंत्रिमंडळ उपसमिती**

राज्यात झालेल्या धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल ४४ खटले मागे घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला आहे. यासंबंधीची शिफारस सरकारला करण्यात आल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आणि उपसमितीचे अध्यक्ष आशीष शेलार यांनी दिली आहे. मात्र महिलांशी संबंधित गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले, वैयक्तिक आणि दिवाणी प्रकरणं ही शासनाच्या धोरणांतर्गत माफ केली जाऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणावरील खटले मागे घेतले जाणार नसल्याचं शेलार यांनी सांगितलं.

---------------------------------------------------

**रविकांत तुपकर**

बुलढाणा जिल्ह्यात संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाला हिंसक वळण लागलं आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एका शेतकऱ्याने आत्मदहनाचा प्रयत्न केला, तर जळगाव जामोद इथं शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयाचा ताबा घेत आक्रमक आंदोलन केलं. या प्रकरणी दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतल आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी आंदोलन तीव्र होत असताना कार्यकर्त्यांनी संयम बाळगावा, असं आवाहन रविकांत तुपकर यांनी केलं आहे.

---------------------------------------------------

**सुधीर मुनगंटीवार**

कोळसा उत्खननासाठी अधिग्रहित होणाऱ्या शेतजमिनीला प्रति एकर किमान ३० लाख रुपयांचा मोबदला देण्याची मागणी चंद्रपूरचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी संबंधित प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्याचे निर्देश मुख्य सचिवांना दिले आहेत. सध्याचा मोबदला महागाई आणि वाढलेल्या पुनर्वसन खर्चाच्या तुलनेत अपुरा असल्याच मुनगंटीवार यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

---------------------------------------------------

**विशेष रेल्वेगाडी**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन उत्तर मध्य रेल्वेने कानपूर सेंट्रल-तिरुचिरापल्ली दरम्यान विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक 01927 ही 17 आणि 24 जून रोजी कानपूरहून, तर गाडी क्रमांक 01928 ही 20 आणि 27 जून रोजी तिरुचिरापल्लीहून धावणार आहे. या विशेष गाडीला नागपूर विभागातील बल्लारशाह, चंद्रपूर आणि नागपूर स्थानकांवर थांबा देण्यात आला असून प्रवाशांनी प्रवासापूर्वी वेळापत्रक आणि आरक्षणाची माहिती तपासून घ्यावी, असं आवाहन रेल्वे प्रशासनाने केल आहे.

---------------------------------------------------

**विशेष मोहीम**

वाशिम पोलिसांनी विशेष मोहीम राबवत जिल्ह्यातील अजामीनपात्र वॉरंट असलेल्या 53 फरार आरोपींना अटक केली आहे. पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या आदेशानुसार 22 अधिकारी आणि 108 कर्मचाऱ्यांनी 15 जून रोजी रात्री ही संयुक्त कारवाई केली. न्यायालयात हजर न राहता फरार झालेल्या आरोपींना ताब्यात घेऊन न्यायालयात हजर करण्यात आलं. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने ही मोहीम राबविण्यात आली.

---------------------------------------------------

**क्रिकेट**

भारत विरुद्ध अफगाणिस्तान एक दिवसीय क्रिकेट सामन्यात आज प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतानं अफगाणिस्तानला विजयासाठी 403 धावांचं लक्ष दिलं आहे. भारत विरुद्ध अफगाणिस्तान एकदिवसीय क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना आज लखनौ इथं सुरु झाला. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि नेदरलँड्स

यांच्यात सामना होणार आहे. हा सामना यूकेमधील लीड्स इथं खेळला जाणार असून भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी सात वाजता सामन्याला सुरूवात होईल.

**----------------------------------------------------**

**फिफा**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत आज सकाळी झालेल्या सामन्यात, गतविजेत्या अर्जेंटिनाने अल्जेरियाचा ३-० ने पराभव केला. या सामन्यात लिओनेल मेस्सीने हॅट-ट्रिक साधत इतिहास रचला. मेस्सीने विश्वचषकात सर्वाधिक १६ गोल करत जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोझच्या विक्रमाची बरोबरी केली.

**----------------------------------------------------**

**हवामान**

आगामी काही तासात विदर्भातील अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, भंडारा, यवतमाळ, वाशिम, गोंदिया, आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळी वारा आणि तुरळक  ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. उद्या देखील नागपूरसह भंडारा, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान कायम राहणार आहे. याच जिल्ह्यांमध्ये उष्णतामान देखील उच्चांकी राहण्याची शक्यता असल्याने उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**----------------------------------------------------**

**राजनाथ सिंह**

आर्थिक वर्ष २०२५-२६ मधे भारताचं संरक्षण उत्पादन १ लाख ७८ हजार कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोचल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे सांगितलं. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यात साडे पंधरा टक्के वाढ झाली आहे.

**----------------------------------------------------**